# दैवी कणांची वैशिष्ट्ये आणि कार्य

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


**- मनोगत** ९

**- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य** ११

**- 'सूक्ष्म' या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ** १३

**- आध्यात्मिक संज्ञांचा अर्थ** १४

**१. दैवी कणांची वैशिष्ट्ये** १५

१ अ. दैवी कणांची उत्पत्ती, स्थिती आणि लय या संदर्भातील वैशिष्ट्ये १५

१ आ. काळ, सगुण-निर्गुण स्तर आणि दैवी कण १७

१ इ. दैवी कणांचे आकार आणि संख्या यांतील पालट १८

१ ई. विविध लोकांतील दैवी कणांची वैशिष्ट्ये १८

* देवतालोकांतील दैवी कणांची वैशिष्ट्ये २०

* सप्तलोकांतील दैवी कणांची वैशिष्ट्ये २०

* सप्तपाताळ येथे असणाऱ्या रज-तमयुक्त कणांची वैशिष्ट्ये २१

१ उ. पंचमहाभूते आणि दैवी कण २६

* पंचमहाभूतांतील प्रमुख घटकांचा दैवी कणांवर होणारा परिणाम २६

* दैवी सुगंध * विविध रंग * चकाकी २७

* कपड्यांवरील चमकी आणि दैवी कण यांच्यातील भेद ३७

* स्वयंप्रकाश * दैवी स्पर्श * दैवी नाद ५०

१ ऊ. अवतारी शक्ती आणि दैवी कण ५८

१ ए. सुदर्शनचक्र आणि दैवी कण ५८

१ ऐ. दैवी कणांच्या तारक आणि मारक बाजू ६०

**२. दैवी कणांचे कार्य** ६१

२ अ. 'भू ते सत्य' लोकांत असलेल्या दैवी कणांची निर्मिती आणि त्यांचे कार्य ६१

२ आ. कणांचा आकार आणि त्यांचे कार्य ६३
२ इ. दैवी कणांचे पंचतत्त्वांशी संबंधित कार्य ७०
* दैवी कणांतील पंचतत्त्वांचे कार्य ७०
* रंगानुसार दैवी कणांची वैशिष्ट्ये आणि कार्य ७२
* सोनेरी रंगाच्या दैवी कणांतून वातावरणात ज्ञानतेज प्रक्षेपित होणे ७५
* चंदेरी कणांचे समष्टी कार्य, म्हणजे रजोगुणातून गती घेऊन साधकांना मायेपासून विलग करणे ७६
* सूर्यप्रकाशात चकाकणारे कण आणि दिव्याच्या प्रकाशात चकाकणारे कण यांचे कार्य ७८
२ ई. सगुण-निर्गुण कार्य ७९
२ उ. शरिरातील कार्य ८६
* शरिरातील स्थानानुसार दैवी कणांचे व्यष्टी अन् समष्टी कार्य ८६
* शरिरात अप्रकट अवस्थेत असणाऱ्या दैवी कणांच्या ऊर्जेमुळे आंतरिक देहशुद्धी साधली जाणे ८७
२ ऊ. व्यष्टी आणि समष्टी कार्य ८८
* व्यष्टी रूपातील सगुण कार्याने भारलेले कण अधिकतः निळे, हिरवे, लाल, गुलाबी आणि मोरपिशी असणे, तर समष्टी कार्यकारी उद्देशाने भारलेले कण अधिकतः चंदेरी अथवा सोनेरी असणे ८८
* दैवी कणांच्या निर्मितीमुळे अवतारी व्यापक समष्टी कार्याचा सगुणातून अविष्कार होण्याच्या प्रक्रियेला चालना मिळून हिंदू राष्ट्र स्थापनेच्या चळवळीस आरंभ होणार असणे ९५
२ ए. सूक्ष्मातील युद्ध १०१
* दैवी कणांनी पृथ्वीवर कार्य करण्यासाठी रज-तम कणांशी लढून वातावरणाची शुद्धी करणे १०३
* समष्टी साधना करणाऱ्या जिवांचे रक्षण होणे १०३
२ ऐ. कार्यकाल १०४
* कार्याच्या उद्देशाप्रमाणे, तसेच कार्यकालाप्रमाणे दैवी कणांनी त्या त्या ठिकाणी किती वेळ रहायचे ते ठरते. १०५
* भाव, श्रद्धा आणि तळमळ असल्यास दैवी कण वातावरणात टिकण्याचा

अवधी १०६
**३. दैवी कणांचे लाभ** **११०**
३ अ. वैयक्तिक स्तरावरील लाभ ११०
* दैवी कणांच्या स्पर्शाने मन, बुद्धी आणि चित्त यांची शुद्धी होणे १११
* येणाऱ्या आपत्काळात दैवी कण साधकांना संरक्षककवचरूपी ऊर्जा देऊन साहाय्य करणार असणे ११२
* साधकांची विहंगम पद्धतीने उन्नती होणे ११३
३ आ. समष्टी स्तरावरील लाभ ११३
* दैवी कणांच्या तेजातून वातावरणातील सगुण रज-तम, तर प्रकाशातून निर्गुण स्तरावरील रज-तम नष्ट होणे ११३
* वातावरणातील दैवी कणांचा विहार, संचार जसा वाढेल, तसे वातावरण साधनेला पूरक बनत जाईल ! ११४
३ इ. दैवी कण साठवून ठेवल्याने होणारे लाभ ११८
३ ई. चांगले लिंगदेह (ऑर्ब) आणि सूक्ष्मातील दैवी कण यांच्या सहवासाने होणारे लाभ ११८
३ उ. दैवी कण आणि चमकी यांच्या वैज्ञानिक चाचण्यांतून दैवी कणांचे अधिक प्रमाणात सिद्ध होणारे लाभ १२२

# मनोगत

एखाद्याची स्थुलातील बुद्धिगम्य वैशिष्ट्ये आणि कार्य समजून घेणे सोपे आहे; पण बुद्धीपलीकडील, म्हणजे सूक्ष्मातील वैशिष्ट्ये आणि कार्य समजणे सामान्य व्यक्तीला अवघड आहे. या ग्रंथामध्ये 'सनातन संस्थे'च्या साधकांना ईश्वराचा कृपाशीर्वादस्वरूप मिळालेल्या आणि त्यानेच निर्माण केलेल्या दैवी कणांची वैशिष्ट्ये, कार्य अन् लाभ दिले आहेत. हा सर्व सूक्ष्मातील भाग मानवजातीला समजावून देणे आणि तो 'इतिहास' म्हणून चिरंतन करणे, हे या ग्रंथाचे प्रयोजन आहे.

दैवी कणांची वैशिष्ट्ये, कार्य आणि लाभ ही माहिती 'सनातन संस्थे'च्या साधकांना मिळत असलेल्या ईश्वरी ज्ञानातून मिळाली आहे. त्या ज्ञानाद्वारे कळते की, सप्तलोक आणि सप्तपाताळ या दोन्हींमध्ये कण मिळतात. प्रत्येक लोकामध्ये वेगवेगळे आकार आणि रंग यांचे कण मिळतात अन् त्यांचे कार्यही वेगवेगळे असते. सप्तलोकांमध्ये सात्त्विक कण, म्हणजेच दैवी कण असतात. अधिकाधिक उच्च लोकांतील दैवी कण अधिकाधिक उच्च आध्यात्मिक पातळीच्या व्यक्तींना मिळतात आणि त्यांमुळे अधिकाधिक उच्च स्तराच्या अनुभूती येतात. याउलट सप्तपाताळांतील कण रज-तमयुक्त असतात आणि ते तामसिक व्यक्ती, उदा. भ्रष्टाचारी, अनैतिक, राष्ट्रद्रोही, धर्मद्रोही व्यक्ती यांना मिळतात.

दैवी कणांची दैवी सुगंध, रंग, चकाकी, स्वयंप्रकाशीपणा, स्पर्श इत्यादी वैशिष्ट्ये सनातनच्या साधकांना ईश्वरी ज्ञानातून समजली. ती या ग्रंथामध्ये दिली आहेत. या माहितीचे महत्त्व म्हणजे, दैवी कणांच्या वैशिष्ट्यांची जी तात्त्विक माहिती ईश्वरी ज्ञानातून समजली, अगदी तशाच तऱ्हेच्या अनुभूती साधकांना दैवी कणांसंदर्भात आल्या. याची काही उदाहरणे म्हणजे, 'दैवी कणांचा दैवी सुगंध मनाला उत्साही बनवतो आणि प्राणशक्ती देतो. दैवी कणांची चकाकी मन आणि बुद्धी यांवरील त्रासदायक शक्तीचे आवरण दूर करते. दैवी कणांचा स्पर्श आल्हाददायी आणि थंड जाणवतो' इत्यादी. दैवी कणांचे आकारानुसार कार्य, व्यष्टी-समष्टी कार्य, सगुण-निर्गुण कार्य, त्यांचा कार्यकाल, त्यांचे लाभ इत्यादी विषयांची परिपूर्ण माहिती या ग्रंथामध्ये आहे. बाजारात मिळणारी कृत्रीम चमकी आणि दैवी कण यांतील भेदही ग्रंथामध्ये स्पष्ट केला आहे.

सर्वांना या ग्रंथातील ईश्वरी ज्ञानाचे आकलन होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना.'

या ग्रंथमालिकेचे सामायिक मनोगत या ग्रंथमालिकेतील 'खंड १ : दैवी कण' या ग्रंथात सविस्तरपणे दिले आहे.

– संकलक